मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभागरचना 'जैसे थे'

## 2017 प्रमाणे चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक होणार : पिंपरीत 32 प्रभाग, नगरसेवक 128

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या तीन वर्षांपासून रखडलेला महापालिकेची निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा झाला असून, पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभागरचना 'जैसे थे' राहणार आहे. २०१७ प्रमाणे चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक होणार असून, ३२ प्रभाग आणि नगरसेवकांची संख्या पूर्वीप्रमाणेच १२८ राहण्याची शक्यता आहे. महापालिकेतील लोकनियुक्त प्रतिनिधींची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली. मात्र, करोना प्रतिबंधक नियम, राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडी, ओबीसी आरक्षणाचा न्यायप्रविष्ट मुद्दा, अशा विविध कारणांमुळे महापालिका निवडणूक तीन वर्षांपासून लांबणीवर पडली आहे.



२०१७ च्या निवडणुकीत १७ लाख लोकसंख्येला महापालिकेत १२८ नगरसेवक आणि ३२ प्रभाग होते. २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या १७ लाख २९ हजार ३५९ आहे. सध्याची लोकसंख्या ३० लाखांवर गेली असल्याचा प्रशासनाचा अंदाज आहे.शहरात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) प्रतिस्पर्धी आहेत. २०१७ मध्ये भाजपने राष्ट्रवादीकडून महापालिकेतील सत्ता खेचून घेतली. आता अजित पवार हे भाजपबरोबर आहेत. त्यामुळे दोन्ही पक्ष महापालिका ताब्यात घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी एकत्रित लढणार, की स्वबळावर याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

### आजपर्यंतची प्रभाग पद्धती

महापालिकेची स्थापना १९८२ मध्ये झाली. मात्र, १९८६ पर्यंत प्रशासकीय राजवट होती.

१९८६ – पहिली निवडणूक झाली. तेव्हा, एक सदस्यीय प्रभाग पद्धती व ६० प्रभाग

१९९२ – निवडणुकीत एक सदस्यीय प्रभाग पद्धती व ७८ प्रभाग

१९९७ – निवडणुकीत एक सदस्यीय प्रभाग पद्धती व ७९ प्रभाग

२००२ – तीन सदस्यीय प्रभाग पद्धती व ३५ प्रभाग होते, नगरसेवक संख्या १०५

२००७ – एक सदस्यीय प्रभाग पद्धती व नगरसेवक संख्या १०५

२०१२ – द्विसदस्यीय प्रभाग पद्धती व ६४ प्रभाग होते, नगरसेवक संख्या १२८

२०१७ – चार सदस्यीय प्रभाग पद्धती व ३२ प्रभाग होते, नगरसेवक संख्या १२८

### 2017 मधील पक्षीय बलाबल

- भाजप – ७७
- राष्ट्रवादी कॉंग्रेस – ३६
- शिवसेना – ९
- मनसे – १

> राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. अद्याप कोणत्याची सूचना देण्यात आलेल्या नाहीत.
>
> **- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, निवडणूक विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये जल्लोष

## भाजपाने पेढे वाटून साजरा केला आनंदोत्सव : भारतीय जवानांच्या कामगिरीला सलाम

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकिस्तान-व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वी कारवाईनंतर पिंपरी-चिंचवड शहरात भारतीय जनता पार्टीतर्फे जल्लोष करण्यात आला. भाजपा मध्यवर्ती कार्यालय, मोरवाडी येथे कार्यकर्त्यांनी एकत्र येत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय सैन्याने ७ मे रोजी पहाटे 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. या कारवाईत लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिदीन यांसारख्या दहशतवादी संघटनांच्या प्रशिक्षण केंद्रांसह नऊ ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले. बहावलपूर, मुरीदके, सियालकोट, भिमबर, कोटली आणि मुझफ्फराबाद या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने एकत्रितपणे ही मोहीम यशस्वी केली.



या यशस्वी कारवाईनंतर पिंपरी-चिंचवड शहरातील भाजपा कार्यकर्त्यांनी शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मोरवाडी येथील कार्यालयात एकत्र येत आनंदोत्सव साजरा केला. विधानपरिषद आमदार उमाताई खापरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी 'भारत माता की जय' आणि 'भारतीय लष्कराचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

यावेळी आमदार उमाताई खापरे म्हणाल्या की, "भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करून देशाचा गौरव वाढवला आहे. भारतीय सैनिकांच्या शौर्याला आणि बलिदानाला आमचा सलाम आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाने प्रत्येक भारतीयाची छाती अभिमानाने फुलून आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ही अतुलनीय कामगिरी केली आहे. भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहर या यशाचा जल्लोष करून भारतीय सैनिकांचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करत आहे."

या कार्यक्रमात विधानपरिषद आमदार उमाताई खापरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, शैला मोळक, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, माऊली थोरात, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, सिद्धेश्वर बारणे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, माजी उपमहापौर केशव घोळवे, माजी नगरसेवक सुरेश भोईर, माजी नगरसेविका सावितताई कुटे, सविताताई खुळे, आरती चोंधे, शर्मिला बाबर, यांच्यासह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पुण्यात चार सदस्यांचा प्रभाग

## 3 वर्षांहून अधिक काळ रखडलेल्या महापालिकेच्या निवडणुका अखेर 4 महिन्यांत होणार

**पुणे | प्रतिनिधी**

तब्बल तीन वर्षांहून अधिक काळ रखडलेल्या महापालिकेच्या निवडणुका अखेर पुढील चार महिन्यांत होणार आहेत. मुंबई वगळता पुणे, पिंपरी चिंचवडसह अन्य महापालिकांच्या निवडणुका राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार चार सदस्यीय प्रभाग पद्धतीनेच होणार असल्याचे स्पष्ट आहे. पुणे महापालिकेची हद्दवाढ झाली असल्याने प्रभाग रचनाही नव्यानेच करावी लागणार असून, राज्य शासनाच्या आदेशानंतर त्यात अधिक स्पष्टता येऊ शकणार आहे.



पुणे महापालिकेच्या नगरसेवकांचा कार्यकाळ 14 मार्च 2022 ला संपुष्टात आला. मात्र, इतर मागासवर्गाचे (ओबीसी) राजकीय आरक्षण रद्द झाल्याने त्यासंदर्भातील याचिका आणि महाविकास आघाडी सरकारने जनगणना झाल्याने दहा टक्के लोकसंख्या वाढ झाल्याने ती गृहीत धरून केलेली प्रभाग रचना याविरोधात सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या होत्या, त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून महापालिकांच्या निवडणुका सातत्याने पुढे गेल्या होत्या. त्यातच जातीनिहाय जनगणनेमुळे या निवडणुका आणखी पुढे जाण्याची शक्यता व्यक्त केली जात असतानाच सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्याने इच्छुक, कार्यकर्ते खडबडून जागे झाले आहेत.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात तीन सदस्यीय प्रभाग पद्धतीने निवडणुका घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र निवडणुकीअगोदरच राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आले. महायुती सरकारने फेब्रुवारी 2024 मध्ये राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबई वगळता अन्य महापालिकांसाठी चार सदस्यीय प्रभाग पद्धतीचा निर्णय घेतला, अर्थसंकल्पीय अधिवेशनात हे विधेयक विधिमंडळात मंजूर झाले आहे. त्यामुळे आता पुन्हा चार सदस्यीय पद्धतीनेच निवडणुका होणार असल्याचे स्पष्ट आहे.

मात्र, हा कालावधी कमी -जास्त करण्याचा अधिकार राज्य मंत्रिमंडळाला आहे. त्यानुसार सरकार त्यावर निर्णय घेऊ शकणार आहे. न्यायालयाने चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिले असल्याने सप्टेंबर ते ऑक्टोबरमध्ये या निवडणुका होतील, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

### नव्याने करावी लागणार प्रभाग रचना

» पुणे महापालिकेची 2017 ची निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने झाली होती. मात्र, त्यानंतर गेल्या आठ वर्षांत तब्बल 32 गावांचा समावेश झाला आहे. ऑक्टोबर 2017 मध्ये समाविष्ट झालेल्या 11 गावांसाठी दोन सदस्यांचा एक प्रभाग करून पोटनिवडणूक घेण्यात आली होती. मात्र, त्यानंतर पुन्हा 23 गावांचा समावेश जुलै 2021 मध्ये झाला आहे. तसेच 11 गावांमधील उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही दोन गावे वगळण्यात आली आहेत. त्यामुळे पुणे महापालिकेची प्रभाग रचना करावी लागणार असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले.

### प्रभाग रचनेसाठी लागणार 120 दिवस

» राज्य शासनाने आदेश दिल्यानंतर प्रारूप प्रभाग रचना करण्यासाठी 60 दिवसांचा कालावधी लागणार आहे. त्यानंतर राज्य शासनाकडे पाठवून त्यावर हरकती-सूचना मागविण्याची प्रक्रिया करून अंतिम प्रभाग रचना निश्चित करण्यासाठी आणखी 60 दिवसांचा कालावधी लागणार आहे.

# महापालिकेच्या मुख्य इमारतीमधील ‘अग्निशामकशामक यंत्रणा’ नादुरुस्त

## महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये अग्निशामक यंत्रणा नादुरुस्त असल्याची माहिती समोर

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये काही वर्षांपूर्वी पावणेदोन कोटी रुपये खर्च करून उभारलेली अग्निशामक यंत्रणा नादुरुस्त असल्याची माहिती समोर आली. अनेक कार्यालयांत ‘स्मोक डिटेक्टर’, ‘स्प्रिंकलर’, सेन्सर काम करीत नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. केंद्र सरकारच्या आदेशानुसार पुणे शहरात आज, बुधवारी मॉक ड्रिल होणार आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने आपल्या कार्यालयांची मंगळवारी तपासणी केली. मात्र, त्यात महापालिका नापास झाली आहे.



मुंबईत मंत्रालयामध्ये काही वर्षांपूर्वी लागलेल्या आगीमध्ये महत्त्वाची कागदपत्रे राख झाली होती. त्यानंतर राज्य सरकारने सरकारी कार्यालयांमध्ये आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास खबरदारीचा उपाय म्हणून यंत्रणा कार्यान्वित करण्याचा आदेश दिला होता. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने २०१२ मध्ये महापालिका भवन या मुख्य इमारतीसह, महापालिकेची सर्व क्षेत्रीय कार्यालये, रुग्णालये, सांस्कृतिक भवन येथे कोट्यवधी रुपये खर्च करून अग्निशामक यंत्रणा उभारली. यामध्ये स्प्रिंकलर, स्मोक डिटेक्टर, सेन्सर बसविण्यात आले आहेत. महापालिकेच्या सावरकर भवन येथे काही दिवसांपूर्वी एका कार्यालयात आग लागल्यानंतर तेथे असलेली अग्निशामक यंत्रणा कार्यान्वित झाली नव्हती. त्यामुळे खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने तातडीने ही यंत्रणा दुरुस्त केली.

महापालिका प्रशासनाने मुख्य इमारतीसह अन्य वास्तूंच्या सुरक्षेचा आढावा घेतला. यात महापालिका भवनमधील अग्निशामक यंत्रणेत त्रुटी दिसली. इमारतीच्या सर्व पॅसेजमध्ये सेन्सरवर आधारित सुरू होणारे स्प्रिंकलर बसविण्यात आले आहेत. मात्र, बहुतांश कार्यालयांत ते बसविण्यात आलेले नाहीत. दहा वर्षांपूर्वी बसविण्यात आलेली ही यंत्रणा वापरण्याची गरज पडली नाही. अनेक कार्यालयांत डागडुजी, नूतनीकरणाची कामे करताना सेन्सर तुटल्याचे समोर आले आहे. बालगंधर्व रंगमंदिरातील अग्निशामक यंत्रणेमध्येही अशाच अडचणी आल्याचे समोर आले आहे.

> “ महापालिका भवन आणि बालगंधर्व रंगमंदिर येथील अग्निशामक यंत्रणा दुरुस्तीसाठी पावले उचलण्यात येत आहेत. पालिकेच्या रुग्णालयांबरोबरच, शाळा आणि सांस्कृतिक भवनमधील अग्निशामक यंत्रणांची दर सहा महिन्यांनी ऑडिट करून देखभाल-दुरुस्ती करण्यात येते.
>
> **- मनीषा शेकटकर, मुख्य अभियंता, विद्युत विभाग, पुणे महापालिका.**

# हजारो कोटींच्या गृहप्रकल्पांचा मार्ग मोकळा

## उच्च न्यायालयाचा निर्णय : पिंपरी-चिंचवडमधील पर्यावरण मंजुरीचा तिढा सुटला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील हजारो कोटी रुपयांच्या गृहप्रकल्पांच्या पर्यावरण मंजुरीचा तिढा अखेर नऊ महिन्यांनी सुटला आहे. या प्रकल्पांना राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन समितीने मंजुरी द्यावी, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यासाठी आठ आठवड्यांची मुदतही न्यायालयाने दिली आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिका आणि भोवतालच्या पाच किलोमीटर परिसरातील २० हजार चौरस मीटरपेक्षा मोठ्या प्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या समितीकडून परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले होते. हा परिसर जास्त प्रदूषित असल्याचे सरकारी यंत्रणेचे म्हणणे होते. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने याबाबत जानेवारी महिन्यात अधिसूचना काढली. त्यानुसार राज्य पातळीवरील पर्यावरण प्रभाव मूल्यांकन समितीकडून मोठ्या प्रकल्पांना पूर्वीप्रमाणे मंजुरी देण्याचे निर्देश देण्यात आले. मात्र, या अधिसूचनेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती मिळाली होती. याप्रकरणी क्रेडाई पुणेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

पिंपरी-चिंचवडच्या परिसरातील सर्वंकष पर्यावरण प्रदूषण निर्देशांक हा २०२४ मध्ये ३२.५२ होता. सर्वाधिक प्रदूषित वर्गवारीसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणापेक्षा हे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड सर्वाधिक प्रदूषित भागाच्या निकषात बसत नाही. येथील प्रकल्पांना पूर्वीप्रमाणे राज्याच्या समितीकडून मंजुरी मिळावी, अशी मागणी क्रेडाईने न्यायालयाकडे केली. यावर उच्च न्यायालयाने, 'पिंपरी-चिंचवडमधील प्रकल्पांना सध्याच्या सर्वंकष पर्यावरण प्रदूषण निर्देशांकाच्या आधारे आणि नियमानुसार राज्याच्या समितीने परवानगी द्यावी,' असे निर्देश दिले. यासाठी आठ आठवड्यांची मुदत उच्च न्यायालयाने दिली आहे.

### घरांच्या किमतीवर परिणाम

पुण्याचा विचार करता शंभराहून अधिक प्रकल्पांना याचा फटका बसला. या प्रकल्पांची एकूण किंमत सुमारे ३० हजार कोटी रुपये आहे. यात २० हजार ते दीड लाख चौरस मीटरपर्यंतच्या मोठ्या गृहप्रकल्पांचा समावेश होता. हे प्रकल्प सहा महिन्यांहून अधिक काळ रखडल्याने विकासकांना थेट फटका बसला. याचबरोबर हे प्रकल्प रखडल्याने गेल्या वर्षी घरांचा पुरवठा कमी झाला. तसेच, सरकारला विकासकांकडून आणि घरांच्या विक्रीतून मिळणारा महसूलही कमी झाला. त्यामुळे या निर्णयाचा परिणाम ग्राहक ते विकासक या साखळीतील सर्व घटकांबरोबरच घरांच्या किमतीवरही झाला.

### गृहनिर्माण क्षेत्राला बसलेला फटका

- १०० मोठ्या गृहप्रकल्पांची मंजुरी प्रलंबित
- प्रत्येक प्रकल्प किमान २ लाख चौरस फूट
- एका प्रकल्पात सुमारे २०० सदनिका
- एका प्रकल्पाची किंमत सुमारे ३०० कोटी
- रखडलेल्या प्रकल्पांचे एकूण मूल्य ३० हजार कोटी रुपये
- मुद्रांक शुल्कासह वस्तू व सेवा करसंकलन कमी

"पिंपरी-चिंचवड महापालिका आणि आजूबाजूचा पाच किलोमीटर परिसर सर्वाधिक प्रदूषित नसतानाही राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन समितीने येथील गृहप्रकल्पांना मंजुरी देण्यास नकार दिला होता. या विरोधात 'क्रेडाई'ने उच्च न्यायालयात दाद मागितली. उच्च न्यायालयाने 'क्रेडाई'च्या बाजूने निकाल दिला असून, समितीला आठ आठवड्यांत प्रकल्पांना मंजुरी देण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे गृहनिर्माण क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला आहे.

– मनीष कनेरिया, पर्यावरण समिती, क्रेडाई, पुणे.

# मान्सूनपूर्व तयारीच्या कामांना गती द्या!

## अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत पीएमआरडीए महानगर आयुक्तांचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यंत्रणेची महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली आकुर्डी कार्यालयात मंगळवारी (दि.६) आढावा बैठक झाली. यात महानगर आयुक्त यांनी संभाव्य आपतकालिन परिस्थितीचा विचार करून पीएमआरडीएची यंत्रणा अलर्ट ठेवत नालेसफाईची मोहीम तातडीने हाती घेण्याचे निर्देश विभागप्रमुखांच्या बैठकीत दिले.



मान्सूनपूर्व रस्त्यांची कामे, दुरुस्ती तातडीने करत मोकळ्या जागांवर टाकलेल्या डेब्रिज न उचलणाऱ्या संबंधित जागा मालकांवर कारवाई करण्याचे निर्देश महानगर आयुक्त यांनी बैठकीत दिले. पीएमआरडीए हद्दीतील काही भागात सर्रासपणे डेब्रिज टाकण्यात आले आहे, अशा जागा मालकांनी ते तातडीने उचलून घ्यावे, अन्यथा संबंधितांना कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. पुणे महानगर आपत्ती प्रतिसाद पथकला (PDRF) पूर, दरड कोसळणे यासह इतर संभाव्य आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्ज ठेवत सर्व यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

पीएमआरडीए हद्दीतील अर्बन ग्रोथ सेंटर भागातील नालेसफाई तातडीने करत नाल्यांच्या प्रवाहातील अडथळे दूर करण्याचे काम हाती घेण्याचे आदेश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी अधिकारी यांना दिले. यावेळी अतिरिक्त महानगर आयुक्त दिपक सिंगला, पोलिस अधिक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे, विकास परवानगी विभागाचे संचालक सुनील मरळे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, सह आयुक्त हिम्मत खराडे, सह आयुक्त डॉ. दिप्ती सुर्यवंशी-पाटील, सह महानियोजनकार श्वेता पाटील यांच्यासह आदी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# पाल्याची शैक्षणिक प्रगती 'निपुण'वर

## 'निपुण महाराष्ट्र' कार्यक्रमाअंतर्गत शिक्षकांना पालकांचे व्हॉट्सॲप क्रमांक घेण्याच्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

'निपुण महाराष्ट्र' कार्यक्रमाअंतर्गत शिक्षकांना पालकांचे व्हॉट्सॲप क्रमांक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पालकांना मुलांची शैक्षणिक प्रगती कळण्यासाठी याचा उपयोग होईल, असा उद्देश असला, तरी अशा कामांत शिक्षकांचा फार वेळ जाऊ नये, अशीही मागणी होत आहे.



शिक्षण विभागाकडून मुख्याध्यापक, शिक्षकांकडे विविध प्रकारची माहिती मागवली जाते. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्यापासून अपार आयडी तयार करण्यापर्यंतची कामे शिक्षक करतात. आता शिक्षण विभागाकडून 'निपुण महाराष्ट्र' अभियान हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी तयार करण्यात आलेले 'निपुण महाराष्ट्र एससीईआरटीएम' हे ॲप शिक्षकांनी डाउनलोड करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पालकांना त्यांच्या पाल्यांची विषयनिहाय प्रगती पाहायला मिळावी, यासाठी पालकांशी थेट संपर्क साधता येण्यासाठी इयत्ता पहिली ते बारावीच्या वर्गशिक्षकांनी त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे व्हॉट्सॲप क्रमांक ॲपमध्ये नोंदवून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नुकत्याच झालेल्या दूरदृश्यप्रणाली बैठकीत या संदर्भातील सूचना देण्यात आल्या.

'राज्य शासनाने शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शिक्षण, सर्वांगीण विकास होणे महत्त्वाचे आहे. मात्र, शासनाकडून नवनव्या योजनांसाठी पालक, विद्यार्थ्यांची माहिती मागवली जाते. त्यामुळे शासनासाठी शाळा या विदा संकलन केंद्र झाल्या आहेत का, असा कधीकधी प्रश्न पडतो. खासगी शाळा सरकारला माहिती देण्यास बांधील नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांत गुणवान शिक्षक असूनही अशा कामांत त्यांचा वेळ वाया जातो,' अशी खंत महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या उपाध्यक्ष जागृती धर्माधिकारी यांनी व्यक्त केली.

'देशात विदा सुरक्षा कायदा लागू झाला आहे. पालकांनी शाळेला दिलेली माहिती शाळांनी परस्पर शासनाला देणे हा कायद्याचा भंग ठरू शकतो. शिवाय काही पालक त्यांची माहिती देण्यास नकार देतात. स्वतःच्या माहितीची सुरक्षितता हा प्रत्येक पालकाचा अधिकार आहे. शासनाला पडताळणी करायची असल्यास शासनाने स्वतंत्र यंत्रणा उभी करावी,' असेही धर्माधिकारी यांनी सांगितले. 'शिक्षकांकडून सतत वेगवेगळ्या प्रकारची माहिती मागवली जाऊ नये. त्या ऐवजी शासनाने एकच ऑनलाइन प्रणाली केल्यास त्यातून थेट माहिती घेणे शासनाला शक्य होईल. मात्र, पालकांना मुलांची प्रगती कळणे हे स्वागतार्ह आहे,' असे सोमनाथ वाळके या शिक्षकाने नमूद केले.

> येत्या काळात 'निपुण महाराष्ट्र' हा शैक्षणिक मंच म्हणून विकसित होणार आहे. या द्वारे विद्यार्थ्यांसाठीचे अभ्यास साहित्य, दृक-श्राव्य चित्रफिती, विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पालकांना त्यांच्या पाल्याच्या प्रगतीची माहिती होऊ शकेल. पालक पाल्याच्या शिक्षणात सक्रियपणे सहभागी होऊ शकतील. मात्र, पालकांचा व्हॉट्सॲप क्रमांक किंवा संपर्क क्रमांक घेण्याची सक्ती नाही.
>
> **- सचिंद्र प्रताप सिंह, शिक्षण आयुक्त.**

### काय आहे निपुण महाराष्ट्र अभियान?

» **निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत इयत्ता दुसरी ते पाचवीच्या १०० टक्के विद्यार्थ्यांनी १०० टक्के अध्ययन क्षमता प्राप्त करणे अपेक्षित आहे. त्यासाठीचा कृती कार्यक्रम स्वयंअर्थसहाय्यित आणि विनाअनुदानित शाळा, तुकड्यांव्यतिरिक्त राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या शाळांना लागू करण्यात आलेला आहे. या अभियानाची अंमलबजावणी ५ मार्च ते ३० जून या कालावधीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**

# मिरचीच्या मुबलक साठ्यामुळे दर स्थिर

## दक्षिणेकडील राज्यात यंदा मिरचीची लागवड मोठ्या प्रमाणावर झाल्याने साठा मुबलक

**पुणे | प्रतिनिधी**

दक्षिणेकडील राज्यात यंदा मिरचीची लागवड मोठ्या प्रमाणावर झाल्याने साठा मुबलक झाला आहे. मात्र, मागणीही कमी असल्याने मिरचीचे दर स्थिर राहणार असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.यंदा तमिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश या तीन राज्यांत मिरचीची लागवड मोठ्या प्रमाणावर झाली आहे. मिरचीचा शीतगृहात मोठ्या प्रमाणावर साठा करण्यात आला आहे. गुंटूर मिरचीची ६९ लाख ५६ हजार ४५० पोती, खम्मममध्ये २१ लाख ८२ हजार ४०० पोती, वरंगळमध्ये २७ लाख ५६ हजार ७६७ पोती मिरचीचा साठा शीतगृहात करण्यात आला आहे.



तीन जिल्ह्यांत मिळून एक लाख १९ हजार पोती एवढा साठा शीतगृहात आहे. ब्याडगी मिरचीची ३० लाख पोती, तसेच कर्नाटकातील अन्य जिल्ह्यांतील २० लाख पोत्यांचा साठा शीतगृहात करण्यात आला आहे. कर्नाटक, आंध्र प्रदेशात मिरचीचा साठा मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्याने सद्य:स्थितीत मिरचीच्या दरात कोणतीही वाढ होण्याची शक्यता नाही, अशी माहिती मार्केट यार्डातील मिरचीचे ज्येष्ठ व्यापारी आणि दी फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ ट्रेडर्सचे (महाराष्ट्र) अध्यक्ष वालचंद संचेती यांनी दिली.

या आठवड्यात भुसार बाजारात दीड लाख पोती मिरचीची आवक झाली. गुंटूर, खम्मम, वरंगळ येथील घाऊक मिरची बाजारात साडेसहा लाख पोत्यांची आवक झाली आहे. तेलंगणासह अन्य भागात २५ हजार पोती मिरचीची आवक झाली आहे. उन्हाच्या कडाक्यामुळे गुंटूर, खम्मम, वरंगळ येथील बाजारपेठा मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बंद राहणार आहेत. पुण्यातील मार्केट यार्डातील भुसार बाजारात मिरचीला मागणी कमी आहे. त्यामुळे मिरचीचे दर स्थिर राहण्याची शक्यता आहे, असे संचेती यांनी नमूद केले.

> उन्हाळ्यात गृहिणींकडून वर्षभराचा मसाला तयार केला जातो. गेल्या काही वर्षांपासून तयार मसाल्यांना मागणी वाढत आहे. त्यामुळे मिरचीच्या मागणीत घट झाली आहे. दक्षिणेकडील राज्यात मिरचीची लागवड मोठ्या प्रमाणावर झाली आहे. शीतगृहात मिरचीचा साठा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. त्यामुळे मिरचीचे दर स्थिर राहणार आहेत.
>
> **- वालचंद संचेती, ज्येष्ठ व्यापारी, मार्केट यार्ड.**